# प्रकरण चौथे

# प्रकरण चौथे

## १९८९ ची सार्वत्रिक निवडणूक :-

### १. राजकीय पार्श्वभूमी :-

१९८४ ते १९८९ या काळात राजीव गांधी यांनी पाच वर्षे या देशाचा कारभार सांभाळला. या काळात त्यांनी अनेक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविण्याचा प्रयत्न केला. पाच वर्षात देशातील आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात अनेक बदल झाले. १९८५ च्या सुमारास त्यांनी नवे आर्थिक धोरण आणि नवे शैक्षणिक धोरण स्वीकारले आणि त्यांच्याबद्दल लोकांच्या मनात कौतुकाची भावना होती.

राजीव गांधी यांनी सत्ता हातात घेतली त्यावेळी देशाची परिस्थिती गंभीर होती. इंदिरा गांधींच्या मृत्यूमुळे नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली होती पंजाब, आसाम, दार्जिलिंग, मिझोराम, त्रिपुरा व मणिपूर या भागात कमालीची अशांतता होती. सुरवातीच्या काळात श्री राजीव गांधींनी खुल्या दिलाने आंदोलन करणाऱ्यांशी हे प्रश्न समझौते करून सोडविले. पंजाबच्या बाबतीत मात्र ते अयशस्वी ठरले. राजीव-लोंगोवाल करार हे राजीव सरकार अंमलात आणू शकले नाही. त्यामुळे दहशतवादी कारवाया चालूच राहिल्या. त्यांच्या काळात केंद्रीकरणाच्या शक्ती फोफावल्या आणि त्याला विरोध म्हणून जागोजागी विघटनवादी शक्तींनी आपले डोके वर काढले. जम्मू-काश्मिर मध्ये अशा विघटनवादी शक्ती फोफावल्या. आंध्र, आसाम, पंजाब आणि तामिळनाडू या प्रांतात प्रादेशिक पक्ष सत्तेवर आले.

आर्थिक क्षेत्रात गांधी सरकारने उदार धोरणाचा स्वीकार केला. त्यातून आयातीस जास्त मोकळीक मिळाली आणि अनेक नियंत्रणे काढून टाकल्यामुळे

मुबलक प्रमाणात वस्तू उपलब्ध झाल्या. त्यातच कराचे प्रमाण कमी केले, विकासाचा दर वाढला, उत्पादन वाढले मात्र त्याचे वितरण योग्य झाले नाही. त्यामुळे आर्थिक विषमतेत वाढ झाली. १९८७ च्या सुरुवातीस राजीव गांधी व अर्थमंत्री व्ही. पी. सिंग यांच्यात मतभेद झाले. त्यानंतर भ्रष्टाचाराच्या प्रकरणांचा छडा लावण्यासाठी विशेषत: परदेशी बँकात भारतीयांची खाती तपासण्यासाठी श्री सिंग यांनी फेअर फॅक्स या अमेरिकन कंपनीची मदत घेतली, त्यामुळे त्यांच्यावर राजीव गांधी यांचे जवळचे सहकारी चिडले व त्यांनी संरक्षण मंत्री पदावर रवानगी झाली. पण संरक्षण मंत्रालयात तर अतिशय जास्त भ्रष्टाचार आहे. पश्चिम जर्मनीकडून घेतलेल्या पाणबुडी प्रकरणात ४० कोटी रु. दलाली देण्यात आली त्यातच बोफोर्स तोफा प्रकरणी ६४ कोटी रु. दलाली दिली असल्याची बातमी स्वीडनच्या नभोवाणीने दिली[१] व सिंग यांच्या दलाली विरुध्दच्या लढ्याला सुरवात झाली याचे पर्यवसान १९८७ मध्ये व्ही. पी. सिंग व राजीव गांधी यांच्यात मतभेद झाले. व श्री सिंग यांनी काँग्रेस पक्ष सोडला.

१९८७ नंतर राजीव गांधी त्यांचे पूर्वीचे सामर्थ्य परत प्राप्त करू शकले नाही. त्यानंतर घेतलेल्या प्रत्येक निवडणुकांत त्यांचा पराभव झाला. हरियाना आणि तामिळनाडू येथील पराभवामुळे त्यांच्या लोकप्रियतेस ओहोटी लागली. त्यामुळे त्यांच्या धोरणात धरसोड निर्माण झाली. अनेक मुख्यमंत्री बदलले, मंत्रीमंडळात बदल केले, पंजाबचे प्रकरण जास्तच चिघळले. श्रीलंकेत भारताने जे सैन्य पाठविले होते त्या सैन्यास तामिळ गनिमांशी युध्द पुकारावे लागले. थोडक्यात राजीव गांधींची धोरणे फसत गेली. यातच व्ही. पी. सिंग यांनी भ्रष्टाचाराविरुध्द आंदोलन सुरु केले.

काँग्रेसला विरोध करण्यासाठी एक धर्मनिरपेक्ष लोकशाहीवादी मध्यममार्गी राजकीय पक्ष निर्माण केला पाहिजे यासाठी व्ही. पी. सिंग यांनी जनमोर्चा, जनतापक्ष आणि भारतीय लोकदल या तीन पक्षाच्या विलिनीकरणाची कल्पना मांडली. ही कल्पना देवीलाल, रामकृष्ण हेगडे,

अजितसिंग, बिजू पटनाईक, मधु दंडवते यांना परत पडली आणि जनता दलाची व्ही. पी. सिंग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना झाली. काँग्रेसचा पराभव केवळ जनता दल आपल्या सामर्थ्यावर करू शकत नाही हे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी राष्ट्रीय आघाडीची स्थापना करण्याचे ठरविले. तेलगू देशमचे श्री रामराव, आसाम गणपरिषदेचे पी. के. महन्ता द्रमुकचे श्री करुणानिधी आणि समाजवादी काँग्रेसचे श्री शरदचंद्र सिन्हा यांच्या सहाय्याने हा राष्ट्रीय मोर्चा स्थापन करण्यात आला. श्री व्ही. पी. सिंग या मोर्चाचे संयोजक बनले.

१९८९ च्या सुरवातीस राजीव गांधी यांच्या सरकारने जवाहर रोजगार योजना नावाची एक नवी योजना सुरु केली. त्याचप्रमाणे पंचायत राज्य विधेयक लोकासमोर आणले पण पंचायत राज्य घटना दुरुस्ती विधेयक राज्यसभेत नामंजूर झाले आणि तो विषय लोकांकडे नेण्यासाठी राजीव गांधी यांनी निवडणुकीची एक महिना आधी घोषणा केली.

दरम्यानच्या काळात बोफोर्सच्या प्रश्नावरून सर्व विरोधी पक्षाच्या खासदारानी लोकसभेचा राजीनामा दिला. विश्वहिंदू परिषदेने बाबरी मशीदीजवळ मंदिर बांधण्यासाठी देशभर रामशिलापूजा उत्सव सुरु केला. त्यातून देशामध्ये मोठ्या प्रमाणावर धार्मिक उन्मादाचे वातावरण निर्माण झाले. हिंदूबरोबरच मुसलमानांमध्ये पण जमातवादी भावना व जमातवादी शक्ती यांच्यात वाढ झाली. या पार्श्वभूमीवर भारतात लोकसभेच्या नवव्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या आणि अपेक्षेप्रमाणे सत्ताधारी काँग्रेस पक्षाचा पराभव झाला आणि विरोधी राजकीय पक्षांचा विजय झाला. याच्या यशापयशाची कारणमीमांसा शोधण्यासाठी विविध राजकीय पक्षानी कोणत्या धोरणाचा अवलंब केला हे तपासून पाहण्यासाठी त्यांनी स्वीकारलेल्या जाहिरनाम्यांचा आधारे तपासून पाहत असताना निवडणूक पूर्व परिस्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे.

१९८४ ते १९८९ या काळात राजीव गांधींची अनेक धोरणे फसलेली होती. या काळात राजीव गांधीनी लोकांच्या इच्छा आकांक्षांना धुळीस मिळविले. भ्रष्टाचार वाढला, देशाची प्रगती खुंटली, फुटीरता शक्ती वाढल्या, लोकशाही तत्वाना बगल देण्यात आली, पाश्चात्त्य देशांवर भारताचे अवलंबित्व वाढले त्यामुळे देशाच्या स्वायत्ततेला धोका निर्माण झाला. त्याबरोबर भ्रष्टाचारात पंतप्रधानसुध्दा सामील झाले. संरक्षण खात्यामध्ये ही भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात झाला याचा परिणाम म्हणून देशात या निवडणुकीत कॉंग्रेसला अपयश आले.

कॉंग्रेसच्या कारकिर्दीत देशात अस्थिरता निर्माण झाली. पंजाबची परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली. निरापराध लोकांना आपले प्राण गमवावे लागले. काश्मिरचा प्रश्न बिकट झाला त्यामुळे हिंसा आणि दहशतीचे प्रमाण वाढले. रामजन्मभूमी आणि बाबरी मशीदचा प्रश्न लोंबकळत राहिला. कॉंग्रेसने बघ्याची भूमिका घेतली. याचवेळी भाजप, विहिंप, आरएसएस. यांनी मुस्लिमांच्या विरोधी विष पेरण्याचा प्रयत्न केला. कॉंग्रेसच्या जाहिरनाम्यात जातीयवादी शक्तीना बाजूला ठेवण्याची स्पष्ट हमी दिलेली नव्हती. त्यामुळे जातीयवादी शक्तीना खतपाणी घालण्याचाच त्यांनी प्रयत्न केलेला आहे. बाबरी मशिद पाडून त्या ठिकाणी राममंदिर बांधू अशा विश्व हिंदू परिषदेच्या घोषणेमुळे मुस्लिम समाज कॉंग्रेस पक्षाकडे वळला होता परंतु भागलपूर दंगल झाली त्यामध्ये कॉंग्रेस कार्यकर्त्यांचा हात होता त्यामुळे मुस्लिम समाजाचा कॉंग्रेसवरील विश्वास उडाला.[२] ~~या दंगलीमध्ये पोलिस प्रशासन देखिल मुसलमानांच्या~~ विरोधात होते. कायदा आणि सुव्यवस्था निर्माण करणे कॉंग्रेसची जबाबदारी होती. पण कॉंग्रेस बहुसंख्यांकांच्या पाठिशी राहिली त्यामुळे मुस्लिम समाज विहिंप व कॉंग्रेस यांच्या विरोधात उभा राहिला. विश्वहिंदू परिषदेच्या शिलान्यासाच्या घोषणेला व्ही. पी. सिंग यांनी विरोध केला. आणि न्यायालयाचा निर्णय मान्य करण्याचे ठरविले त्यामुळे मुस्लिम अल्पसंख्यांकांची मते कॉंग्रेसच्या विरोधात गेली.

दरम्यानच्या काळात बोफोर्सच्या प्रश्नावरून सर्व विरोधी पक्षांच्या खासदारांनी लोकसभेचा राजीनामा दिला. याच काळात महाराष्ट्रात शिवसेना-भाजपा युतीने हिंदुत्वाच्या प्रश्नावर निवडणुका लढविण्याचे ठरविले. विश्वहिंदू परिषदेने बाबरी मशीदीजवळ मंदिर बांधण्यासाठी देशभर रामशिलापूजा उत्सव सुरू केला. त्यातून देशामध्ये मोठ्या प्रमाणात धार्मिक उन्मादाचे व जमातवादाचे वातावरण निर्माण झाले. अनेक ठिकाणी हिंस्त्र अशा हिंदू मुसलमान दंगली झाल्या. त्यात शेकडो लोक मारले गेले. रामशिला पूजेतूनच दंगलीचे प्रसंग उद्‌भवले. हिंदूबरोबरच मुसलमानांच्या मध्ये पण जमातवादी भावना व जमातवादी शक्ती यांच्यात वाढ झाली. उत्तरप्रदेश आणि बिहारमध्ये अनेक दंगली झाल्या त्यात भागलपूरची दंगल फार भीषण होती. त्यात चारशे लोक मारले गेले. या परिस्थितीत झालेल्या निवडणुकीत मुस्लिम अल्पसंख्यांक आणि जमातवादी शक्तींच्या मतांची विभागनी झाली, त्यामध्ये राष्ट्रीय आघाडीची सरशी झाली आणि काँग्रेसचा पराभव झाला.

या काळात भारतीय जनता पक्षाने गांधीवादी समाजवादाचा व वाजपेयीप्रणित उदारमतवादाचा त्याग केला. भाजपच्या या जमातवादास भारतीय कम्युनिस्ट पक्षाने व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने विरोध केला. जातीय-सलोख्यासाठी लोकनिदर्शने घडवून आणली. श्री विश्वनाथ प्रताप सिंग यांनी डाव्या पक्षास पाठिंबा देत जमातवादास विरोध केला. काँग्रेस विरोधी मते संघटित करीत असतानाच जमातवादास आश्रय दिला नाही त्यामुळे त्यांची विश्वासार्हता वाढत गेली.

त्या काळात राजीव गांधी यांचे सरकार विश्वासार्हता गमावीत होते. बोफोर्स प्रकरणात महालेखापालाच्या रिपोर्टनंतर व मद्रासमधील दैनिक हिंदूतील गौप्यस्फोटामुळे सरकार काहीतरी दडपत आहे अशी भावना लोकांच्या मनात निर्माण झाली. सार्वत्रिक भ्रष्टाचार, हिंसाचार, गुंडगिरी

याच बाद, राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात बेरोजगारी आणि बाबीमुळे साधारण सत्ताधारी सरकारच्या विरोधी बनले होते त्यातच महागाई, आजारी उद्योगधंदे बेकारी आणि उपासमार यामुळे गरीब लोकांना जीवन जगणे अवघड झाले होते त्यामुळे निवडणूक परिस्थिती सत्ताधारी पक्षासाठी अवघड होती याचे पर्यवसान सत्ताधारी पक्षाच्या पराभवात झाले.

| पक्ष | राजकीय धोरण | सामाजिक धोरण | आर्थिक धोरण | परराष्ट्र धोरण |
|---|---|---|---|---|
| काँग्रेस [आय] | १] दुरदर्शन व आकाशवाणीस स्वायत्तता परंतु ते माध्यम सरकारच्या ताब्यात राहील. | १] जनतेसाठी रस्ते बांधणी, वीज-पुरवठा टपालसेवा, स्वयंपाक गॅस इत्यादी सोयी. | १] स्वावलंबी विकासाचा मार्ग खुला करण्यात येईल. | १] परराष्ट्रांशी मैत्रीचे संबंध |
| | २] देशाची एकता आणि अखंडता राखण्या-या प्रयत्न. | २] आर्थिक विकासात सामाजिक न्याया-कडे दुर्लक्ष केले जाणार नाही. | २] शेती, उदयोग व व्यापार यात स्पर्धेचे तत्व. | २] आंतरराष्ट्रीय शांततेसाठी प्रयत्न. |
| | ३] सर्वसामान्य नागरीकांना तात्डतोब व कमी खर्चात न्याय, राष्ट्रवादीशक्तीचा रोखण्यासाठी न्यायव्यवस्थेची पुनर्रचना. | ३] गरीबी निर्मुलनाच्या कार्यक्रमाला अग्रक्रम. | ३] उत्पादनात वाजवी नफा मिळ-विण्याचा प्रयत्न. | ३] वर्णद्वेष, गटबाजीचे राजकारण, साम्राज्यवाद यापासून अलीप्त. |
| | ४] पंचायत व नगरपालिकांना जास्त सत्ता देऊन लोकांच्या हातात जास्त अधिकार. | ४] शहरी व ग्रामिण भागातील पाणीपुरवठा, स्वच्छता योजना विशेष समस्या समजून अग्रक्रमाने प्रयत्न. | ४] सहकारी संस्था, ग्राहक व उत्पादक यांना संरक्षण. | ४] शस्त्रास्त्र स्पर्धेला प्रतिबंध. |
| | ५] रामजन्मभूमी प्रश्नावर विश्वहिंदु परिषदेशी चर्चा यासाठी संतविश्व समासदाची समिती नियुक्त. | ५] मागासवर्गीय जातीजमातीना सध्या प्रमाणात राखीव जागांची तरतुद. | ५] शहरी बेकारीवर उपाययोजना. | |
| | ६] कोणावरही गुन्हा सिध्द झाल्याशिवाय कार्यवाही नाही. | ६] नवीन शैक्षणिक धोरणाचा अवलंब. | ६] आर्थिक प्रगतीला दळणवळणाच्या माध्यमातून चालना. | |
| | ७] धर्मनिरपेक्षता तत्वाचा अग्रक्माने विचार. | ७] जातीय उतरंड कमी करण्यासाठी दुर्बलांना अधिक अधिकार. | ७] रोजगारीवर लक्ष ठेवण्यात येईल, व्यापार उदयोग यांची रचना रोज-गारवाढीच्या दिशेने. | |
| | | | ८] उत्पादकास वाजवी नफा मिळावा म्हणून दलाली नष्ठ. | |
| | | | ९] कारखानदारीत आधुनिकीकरण आणून बेरोजगारीवर मात. | |
| | | | १०] लघुउदयोग, शेतीवर आधारीत उदयोग यांना सरकारकडून सहकार्य. | |
| | | | ११] जवाहर रोजगार योजनेची अंमलबजावणी. | |
| | | | १२] देशाचे आर्थिक सार्वभौमत्व जपण्याचा प्रयत्न. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दल | १] भ्रष्टाचार नष्ट करण्याचा प्रयत्न. | १] जातीय तणाव कमी करण्यासाठी लोकांची मने जोडणे. | १] लघुउद्योग कुटीरोद्योगांना प्राधान्य | १] शेजारी राष्ट्रांशी मैत्रीचे आणि सलोख्याचे संबंध. |
| | २] निवडणूक सुधारणा व निवडणुकीतील भ्रष्टाचाराला आळा घातला जाईल. | २] स्त्रिया, मागासवर्गीय, अनुसूचित जमाती, अल्पसंख्यांक यांचा आर्थिक सामाजिक विकासाची हमी. | २] शेतकऱ्यांची १०,००० पर्यंतची कर्जे माफ. | २] आंतरराष्ट्रीय क्षेत्रात शांतता प्रस्तापित करणे. |
| | ३] आकाशवाणी, दुरदर्शन यावरील सरकारी नियंत्रण दुर करून ती स्वातंत्र करण्यात येईल. | | ३] शेतीमालास योग्य भाव बांधुन देण्यात येतील. | ३] प्रांतीय वाद, वसाहतवाद, नववसाहतवाद या नितीला विरोध. |
| | ४] पंजाब, काश्मिर, आसाम या राजकीय समस्या सोडविल्या जातील. | ४] शेतकरी व ग्रामिण भागासाठी आरोग्य सुविधा. | ४] कामगारांना व्यवस्थापनात सहभाग. | ४] अलिप्ततावादाचा पुरस्कार. |
| | ५] विकेंद्रीकरण व लोकांना सत्ता देण्यावर भर. | ५] शिक्षणपद्धतीत बदल करून रोजगाराभिमुख करणे. | ५] किमान वेतन व वाजवी वेतन या प्रश्नांची सोडवणूक. | ५] वंशभेदनीतील विरोध. |
| | ६] विविध पक्ष व उमेदवाराचे निवडूक खर्च तपासणे. | ६] सरकारी नोकरीकरीता मुलाखतीला हजर राहण्यास उमेदवाराला मोफत पास. | ६] आर्थिक स्वावलंबनात प्राधान्य. | |
| | ७] केंद्र राज्य संबंधा विषयी हमी. | ७] स्त्रियांना संपत्तीमध्ये समान वाटा मिळण्यासाठी कायदा. | ७] परदेशी कराचा बोजा कमी केला जाईल. | |
| | ८] न्याय व्यवस्था व वृत्तपत्रे यांच्या स्वातंत्र्याची हमी. | ८] सर्व दारू दुकांनावर बंदी. | ८] असंघटीत कामगार व जनता यांच्यासाठी फायदाची योजना आखणे. | |
| | ९] फुटीरवाद व प्रदेशवाद यांना आळा | ९] ग्रामिण व शहरी लोकांना पिण्याच्या पाण्याची सोय. | ९] बेरोजगार आणि तांत्रिक पदवीधरांना स्वयंरोजगारासाठी कर्जपुरवठा. | |
| | | १०] अल्पसंख्यांक, आर्थिक, सामाजिक दृष्ट्या मागासलेले यांच्यासाठी खास कायदेशी तरतूद. | १०] मोठ्या जलसंचय प्रकल्पासाठी वित्त पुरवठा. | |
| | | ११] मुलांचा शारिरीक व बौद्धिक दर्जा वाढविण्याचा प्रयत्न. | | |

| भारतीय जनता पक्ष | १] सर्वांना न्याय आणि सर्वांना समाधान. | १] सर्वधर्म समभाव आणि धर्मातील राज्यांच्या तत्त्वांचा अवलंब. | १] राज्यांच्या हातात एकवटलेल्या आर्थिक अधिकाराचे विकेंद्रीकरण. | १] अलिप्ततावादाचा पुरस्कार. |
|---|---|---|---|---|
| | २] परदेशी व्यवहारातील भ्रष्टाचाराची चौकशी. | २] स्त्रिया, युवक, सेवानिवृत्त, शेतकरी, मागासवर्गीय यांच्यासाठी खास तरतूद. | २] विक्रीकर बंद करण्यात येईल. | २] निशस्त्री करणावर भर. |
| | ३] सर्व नागरिकांना सक्तीने मतदानात भाग. | ३] उत्तर प्रदेशात दुय्यम कार्यालयीन भाषा म्हणून उर्दूला प्राधान्य. | ३] मोठे सरकारी उद्योग गोठविण्यात येतील. | ३] महासत्तांची ताकद कमी करण्याचा प्रयत्न. |
| | ४] निवडणुकीत आधुनिक यंत्रसामुग्रीचा वापर. | ४] सामाजिक स्वास्थ्यासाठी राममंदिर बांधण्यास परवानगी. | ४] वृत्तपत्र जाहिरातीवरील कर रद्द. | ४] शेजारी राष्ट्रांशी शांततेचे आणि सलोख्याचे संबंध प्रस्थापि |
| | ५] पोष्टाने मतदानाची सोय. | ५] संस्कृत भाषेला प्रोत्साहन. | ५] काम करण्याचा हक्क दिला जाईल. | |
| | ६] दिल्लीला राज्याचा तर लडाखला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा. | ६] निर्वासितांना सुरक्षितता देण्यात येईल. | ६] रोजगार निर्मितीवर भर. | |
| | ७] धर्मातील राज्याचा स्वीकार. | ७] ३७० वे घटना कलम रद्द करून सर्व देशभर एक नागरी कायदा लागू करणे. | ७] आर्थिक प्रवाह रद्द करून किंमतीवर नियंत्रण. | |
| | ८] लोकपाल व लोकायुक्तांची नियुक्ती करून पंतप्रधान व मुख्यमंत्री यांना त्यांच्या अधिकारात आणणे. | ८] शेतकरी, कारागीर, भूमिहीन मजूर, महिला यांच्या विकासासाठी नवी योजना. | ८] बेकारांना आर्थिक सहाय्य. | |
| | ९] मंत्र्यांना दरवर्षी त्यांची मालमत्ता जाहिर करण्याचे बंधन घालणे. | ९] रोजगार निर्मिती करणाऱ्या शिक्षणपध्दतीचा अवलंब. | ९] पुरेसे उत्पादन आणि किंमत स्थिर ठेवण्याची हमी. | |
| | १०] मुलभूत अधिकार म्हणून वृत्तपत्रांना स्वातंत्र्य. | १०] गोहत्या बंदीवर भर देण्यात येईल. | १०] बँका आणि परकीय कंपन्यांचे राष्ट्रीयकरण. | |
| | ११] दुरदर्शन व आकाशवाणीला स्वायत्तता. | ११] मंडळ अहवालाची अंमलबजावणी न करता आर्थिक मागासलेपणा या आधारावर राखीव जागा. | | |
| | १२] पंजाब समस्या सोडविण्यासाठी शांततामय मार्गाचा अवलंब. | | | |
| | १३] जम्मू-काश्मिरचा विकास व प्रादेशिक असमतोल दूर. | | | |
| | १४] हिंसेमुळे होणाऱ्या गंभीर स्फोटावर न्यायालयीन चौकशी. | | | |

| पक्ष | राजकीय धोरण | सामाजिक धोरण | आर्थिक धोरण | परराष्ट्रीय धोरण |
|---|---|---|---|---|
| मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष. | १] समाजवादी लोकशाही राजकीय व्यवस्थेचा स्वीकार. | १] जनशक्तीपुढे जातीयवादी शक्तींना एकाकी पाडणे. | १] परकीयांच्या दबावापासून मुक्त आणि स्वतंत्र आर्थिक विकासासाठी नियोजनाला प्राधान्य. | १] अलिप्तता वादाचा स्वीकार. |
| | २] देशाची एकता आणि अखंडता टिकविण्यासाठी जातीयवादास विरोध. | २] अल्पसंख्यांकांना पूर्णपणे संरक्षण, समाजामध्ये सर्व क्षेत्रात त्यांना समान संधी उपलब्ध करणे. | २] कामगारांना व्यवस्थापनात सहभाग. | २] परराष्ट्र धोरणाचा पाया सा साम्राज्यवादास विरोध आणि साम्यवादी राष्ट्रांशी मैत्री. |
| | ३] केंद्र-राज्य संबंधाची लोकशाही मार्गाने पुनर्रचना घटकराज्यांना जास्त अधिकार. | ३] स्त्रिया व मागासवर्गीयांना दिल्या जाणा-या वागणूकीत सुधारणा होण्यासाठी स्वतंत्र कायदा. | ३] कापड आणि ताग उद्योगाचे राष्ट्रीयकरण. | ३] तिस-या जगातील शांततावादी राष्ट्रांना पाठींबा. |
| | ४] विघटनावादी चळवळींना विरोध. | ४] निरक्षरता निर्मूलन, सक्तीचे प्राथमिक शिक्षण. | ४] मक्तेदारी भांडवलदारीस विरोध आणि रोजगार संधी वाढविणे. | |
| | ५] सर्व क्षेत्रातील भ्रष्टाचार निपटून काढणे. | ५] अल्पसंख्यांकांना त्यांचे अधिकार आणि संरक्षण यासाठी खास तरतूद. | ५] काँग्रेसचे आर्थिक आणि स्वयंपूर्णतेचे धोरण शिथिल करणे. | |
| | ६] लोकांच्या लोकशाही अधिकारांची हमी. | ६] जमीन सुधारणा करण्यात येईल. | ६] ग्रामीण आणि शहरी बेरोजगारांना बेकार भत्ता. | |
| | ७] काश्मिर व पंजाबमधील अतिरेकी कारवायांचा बंदोबस्त करणे. | | ७] सार्वजनिक वितरणपद्धतीद्वारे लोकांना कमी दरात अन्नधान्याचा पुरवठा. | |
| | ८] रामजन्मभूमी-बाबरी मशिदीचा प्रश्न न्यायालयीन निर्णयानुसार सोडविणे. | | ८] शेतक-यांना शेतजमिनीच्या किंमती कमी करणे. | |
| | ९] समाजात दहशत निर्माण करणारे कायदे रद्द करणे. | | | |

## १९८९ च्या लोकसभा निवडणूक जाहिरनाम्याचे विश्लेषण -

१९८९ च्या निवडणुकीची पूर्वपरिस्थिती लक्षात घेता या कालावधीत काँग्रेस पक्ष कथित भ्रष्टाचाराच्या गर्तेत सापडला होता. तसेच काँग्रेसमधील मोठा गट फुटला होता. जनता दल आणि त्यांच्या मित्रपक्षात उमेदवारीबाबत समझोता झाला होता. भा.ज.प. ने रामशिला पूजन व शिलान्यासाद्वारे धार्मिक व भावनिक वातावरण तयार केले होते, व्ही.पी. सिंग यांनी यांची स्वच्छ नेतृत्वाची प्रतिमा तयार झाली होती. या परिस्थितीत राजकीय पक्षांनी या निवडणुकीसाठी घोषित केलेल्या जाहिरनाम्यांचा मतदार वर्गावर किती प्रभाव पडला याचा आढावा घेऊ.

### राजकीय-धोरण -

१९८९ च्या निवडणुकीपूर्व परिस्थितीला यशस्वीपणे सामोरे जाण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी आपल्या जाहिरनाम्यामध्ये व्यापक स्वरूपाच्या धोरणांना पुरस्कार केलेला आहे. त्यामध्ये अनेक आर्थिक, सामाजिक, राजकीय धोरणांचा समावेश होतो. राजकीय धोरणामध्ये काही पक्षांनी समान धोरणांचा अवलंब केलेला दिसतो. त्यामध्ये देशाची एकता आणि अखंडता राखणे, धर्मनिरपेक्षता तत्वाचे पालन, लोकशाही मूल्यांची जपणूक, दूरदर्शन व आकाशवाणी यास स्वायत्तता दिली जाईल, इत्यादी राजकीय धोरणांच्या बाबतीत सर्व राजकीय पक्षांचे एकमत होते. काँग्रेस पक्ष वगळता अन्य सर्व पक्षांनी भ्रष्टाचार निर्मूलनावर भर दिला आहे.

सर्वा सर्व राजकीय धोरणांच्या सारखेपणाबरोबरच राजकीय पक्षांनी काही वेगळ्या तत्वाचा अवलंब केलेला आहे. त्यामध्ये काँग्रेस पक्षाने पंचायती व नगरपालिकांना अधिक सत्ता देण्याची हमी दिली आहे. जनता दलाने निवडणूक सुधारणाची घोषणा, भा.ज.प. ने दिल्लीस राज्याचा व लडाखला

केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देणे, लोकपाल व लोकायुक्तांची नियुक्ती, निवडणूक सुधारणांची हमी, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राजकीय धोरण, जनता दल व काँग्रेस यांच्याप्रमाणेच आढळते.

निवडणूक पूर्व परिस्थितीकडे लक्ष देता असे दिसून येते की, काँग्रेस नेतृत्वाची असमर्थता, भ्रष्टाचाराचे कथित आरोप, रामशिलापूजन, व्ही.पी. सिंग यांची स्वच्छ प्रतिमा, निवडणूक समझोते यामुळे काँग्रेस विरोधी वातावरण निर्मिती उत्तर भारतात झाली. शेती व काँग्रेस विरोधी पक्षांनी भ्रष्टाचाराच्या कथित मुद्यावर केलेले प्रचाराचे केंद्रीकरण यामुळे समाजातील हा परिवर्तनीय गट राष्ट्रीय विरोधी आघाडीकडे झुकला.

## २. सामाजिक धोरण –

१९८९ च्या लोकसभा निवडणुकीसाठी घोषित केलेल्या जाहिरनाम्यातील सामाजिक धोरणाचा बारकाईने अभ्यास केला असता काही विशिष्ट धोरणांच्या बाबतीत राजकीय पक्षामध्ये एकमत असल्याचे दिसते, त्यामध्ये प्रामुख्याने जनतेला सर्व जीवनावश्यक सोयी उपलब्ध करुन देणे, गरीबी निर्मूलनासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे, सर्वांसाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय करणे, नवीन शैक्षणिक धोरणाचा अवलंब करणे इत्यादी सामाजिक सुधारणांच्या दृष्टीने घोषित केलेल्या धोरणात सर्वच पक्षांच्या बाबतीत समानता आढळते.

वरीलप्रमाणे काही समान धोरणाबरोबरच सामाजिक विकासासाठी राजकीय पक्षांनी वेगळ्या धोरणाचा अवलंब केलेला आहे, त्यामध्ये काँग्रेस(आय) पक्षाने सामाजिक न्यायाद्वारे आर्थिक विकास घडविणे, मागासवर्गीयांसाठी संख्येच्या प्रमाणात राखीव जागा ठेवणे, जातीय उतरंड कमी करण्यासाठी दुर्बलांना अधिक अधिकार देणे, जनता दलाने स्त्रिया, मागासवर्गीय अल्पसंख्याक

यांना आर्थिक, सामाजिक विकासाची हमी दिली, रोजगाराभिमुख शिक्षण पध्दतीचा अवलंब, सरकारी नोकरीसाठी मुलाखतीस आलेल्यांना मोफत प्रवासाची सोय, सर्व दारू दुकानावर बंदी घालणे, शेतकरी व ग्रामीण भागासाठी आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे, भारतीय जनता पक्षाने उत्तर प्रदेशात उर्दू भाषेला दुय्यम कार्यालयीन भाषा म्हणून मान्यता, संस्कृत भाषेस प्राधान्य, निर्वासितांना संरक्षणाची हमी, घटनेतील ३७० वे कलम रद्द करणे, समान नागरी कायदा करणे, गोहत्या बंदी, राखीव जागासंदर्भात आर्थिक मागासलेपण हा निकष लावणे तर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने जातीयवादी शक्तींना प्रतिबंध घालणे इत्यादी वेगळ्या स्वरूपाच्या सामाजिक धोरणाचा अवलंब हा वरीलप्रमाणे राजकीय पक्षांनी केलेला आहे.

यावरून सर्व राजकीय पक्षांनी सामाजिक धोरणामध्ये मागासवर्गीयांना विकासासाठी सवलती देण्याबाबत किमान समानता पाळलेली आहे. भारतीय जनता पक्षाने राममंदिराची केलेली घोषणा ही हिंदी भाषिक पट्ट्यात महत्त्वाची ठरली आहे. सामाजिक धोरणाबाबत भा.ज.प.ची वरील घोषणा वगळता इतर सर्व पक्षांच्या धोरणात समानता आढळते. वरिष्ठ घोषणांचा फायदा काही अंशी जे परिवर्तनीय मतदार धार्मिक भावनेने प्रेरित झालेल्यांच्या मार्फत राष्ट्रीय आघाडी व भारतीय जनता पक्षाला झालेला दिसतो.

३. <u>आर्थिक धोरण -</u>

१९८९ च्या निवडणुकीत जाहिर केलेल्या आर्थिक धोरणाचा सत्ताधारी व विरोधी पक्ष यांच्यामध्ये तुलना केली असता सर्वच राजकीय पक्षामध्ये काही समान धोरणे परंपरागत असल्याची दिसतात. त्यामध्ये आर्थिक स्वावलंबन, शहरी व ग्रामीण बेकारीवर मात करण्यासाठी उपाय योजना करण्यात येतील, शेतीची सर्वार्थाने प्रगती केली जाईल, कामगारांना व्यवस्थापनात सहभाग दिला जाईल,

सर्वांना कमी दरात अन्न पुरवठा करण्यात येईल. अशाप्रकारच्या समान आर्थिक कार्यक्रमांचा अवलंब सर्वच राजकीय पक्षांनी केलेला दिसतो.

वरीलप्रमाणे राजकीय पक्षांच्या आर्थिक धोरणात समानता दिसून येत असली तरी काही बाबतीत विशिष्ठ आर्थिक तत्वांचा अवलंब व इतर पक्षापेक्षा वेगळी धोरणे स्वीकारली आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने कॉंग्रेस पक्षाने दळणवळणाच्या माध्यमातून आर्थिक विकास साधला जाईल. दलाली नष्ट करण्यात येईल. कारखान्याचे आधुनिकीकरण केले जाईल, जनता दलाने शेतकऱ्यांची १०,००० रु. पर्यंतची कर्जे माफ करण्यात येतील. परदेशी कर्जाचा बोजा कमी करणे, मोठे जलसिंचन प्रकल्प हाती घेणे, भा.ज.प.ने विक्रीकर बंद करणे, मोठे सरकारी उद्योग बंद करणे, प्राईस कमिशनची स्थापना केली जाईल, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने परकियांच्या दबावापासून मुक्त आणि स्वतंत्र आर्थिक विकासासाठी नियोजनाला प्राधान्य; कापड व साग उद्योगाचे राष्ट्रीयकरण अशाप्रकारची काही वेगळी धोरणे वरील राजकीय पक्षांनी स्वीकारली आहेत.

थोडक्यात जाहिरनाम्यातील आर्थिक धोरणामधील सारखेपणा व मतभेदापैकी जनता दलाने जाहिर केलेले शेतकऱ्यांना १०,००० रु. पर्यंतचे कर्ज माफीचे धोरण हे कॉंग्रेस आधुनिकीकरण, दळणवळणाद्वारे आर्थिक विकासाला चालना, दलाली नष्ट करणे या धोरणापेक्षा एका विशिष्ट गटाला आकर्षून घेणारा प्रभावी वाटते.

## ४. परराष्ट्रीय धोरण –

भारताचे शेजारील राष्ट्रांशी असलेले संबंध आणि आंतरराष्ट्रीय पत ही अधिक दृढ करण्याच्या दृष्टीकोणातून सर्वच राजकीय पक्षाचे परराष्ट्रीय धोरण हे परंपरागत पध्दतीचे असल्याचे दिसते. शिवाय सर्वच पक्षाचे परराष्ट्र धोरण समान असल्याचे आढळून येते, त्यामध्ये शेजारील राष्ट्रांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करणे, आंतरराष्ट्रीय शांततेसाठी प्रयत्न, निःशस्त्रीकरण, अलिप्ततावादाचा पुरस्कार, साम्राज्यवाद, वसाहतवादास विरोध इत्यादी धोरणांचा स्वीकार केला आहे.

## १९८९ ची लोकसभा निवडणूक - विश्लेषण -

१९८९ च्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये सहभागी झालेल्या राजकीय पक्षांनी स्वीकारलेल्या ध्येयधोरणांचा भारतातील मतदार वर्गाच्या मनावर कितपत प्रभाव पडला हे तपासून पाहण्यापूर्वी देशातील राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थिती विचारात घेणे गरजेचे आहे.

१९८४ ते १९८९ या पाच वर्षात राजीव गांधींनी देशाचा कारभार सांभाळला. सुरवातीचे काही दिवस त्यांनी आपल्या कारकिर्दीचा चांगला ठसा उमटवला. नवे आर्थिक धोरण, नवे शैक्षणिक धोरण स्वीकारले. आसाम, दार्जिलिंग, मिझोराम, त्रिपुरा, मणिपूर या ठिकाणचे प्रश्न खुल्या दिलाने सोडविले. पंजाबच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यात मात्र राजीव गांधी अपयशी ठरले. त्यानंतर विघटनवादी शक्ती फोफावल्या. अनेक राज्यात प्रादेशिक पक्ष सत्तेवर आले. आर्थिक क्षेत्रात गांधी सरकारने उदार धोरणांचा स्वीकार केल्यामुळे आर्थिक विषमता वाढली. त्यातच अर्थमंत्री व्ही. पी. सिंग व राजीव गांधी यांचे संबंध बिघडले. बोफोर्स व जर्मन पाणबुड्यांच्या संदर्भात झालेली भ्रष्टाचाराची प्रकरणे राजीव सरकारच्या विरुद्ध वातावरण निर्माण करण्यास कारणीभूत ठरली. हरियाना व तामिळनाडू मधील विधानसभा निवडणुकीत राजीव गांधींना अपयश आले त्यामुळे त्यांच्या लोकप्रियतेला ओहोटी लागली. त्यांच्या धोरणात असलेल्या धरसोड वृत्तीमुळे व मंत्रिमंडळातील सततच्या बदलामुळे राजीव सरकारविषयी लोकांमध्ये सहानुभूती राहिली नाही. त्यातच व्ही. पी. सिंग यांनी भ्रष्टाचाराविरुद्ध आंदोलन सुरू केले. १९८९ च्या सुरवातीला पंचायत राज विधेयक राज्यसभेने नामंजूर केले. याच काळात बोफोर्स प्रश्नावरुन सर्व विरोधी खासदारांनी राजीनामा दिला, विश्व हिंदू परिषदेच्या रामशिलापूजा उत्सवामुळे देशभर धार्मिक उन्मादाचे वातावरण निर्माण झाले. हिंदूबरोबर मुसलमानांच्यामध्ये ही जमातवादी भावना व जमातवादी शक्ती यांच्यात वाढ झाली या पार्श्वभूमीवर भारतात लोकसभेच्या नवव्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या आणि अपेक्षेप्रमाणे सत्ताधारी काँग्रेस पक्षाचा पराभव झाला.

वरील परिस्थिती विचारात घेता सर्व राजकीय पक्षांनी आपल्या धोरणामध्ये व जाहिरनाम्यामध्ये आर्थिक सुधारणावादी कार्यक्रमांचा समावेश केलेला होता. या सर्व धोरणांचा मतदार वर्गावर प्रभाव पडलाच परंतु राजीव सरकारच्या कारकिर्दीत देशामध्ये अनेक राजकीय समस्या उद्भवल्या याचाही मोठ्या प्रमाणात प्रभाव दिसतो. विशेषत: या निवडणूकीत बोफोर्स भ्रष्टाचार प्रकरण आणि भाजपची हिंदुत्ववादी भूमिका यामुळे या निवडणुका लढविल्या आणि त्यामध्ये कोणत्याही एकापक्षाला पूर्ण बहुमत मिळालेले नाही. निवडणूक निकालावरून हे स्पष्ट होते.

तक्ता क्रमांक ८

१९८९ च्या लोकसभा निवडणुकांचे निकाल.

| पक्षाचे नांव | मिळालेल्या जागा | मतांची टक्केवारी. |
|---|---|---|
| काँग्रेस (आय) | १९३ | ४०.७४ |
| जनता दल | १४१ | १७.९३ |
| भा.ज.प. | ८८ | ११.८३ |
| मा.क.प. | ३२ | ६.६८ |
| तेलगू देसम | १२ | |
| भा.क.प. | १२ | २.६७ |
| तेलगू देसम | २ | ३.४९ |

१९८० च्या निवडणूक निकालाशी तुलना करता या निवडणूकीत कोणत्याही एका-पक्षाला लोकसभेत पूर्ण बहुमत मिळालेले नाही. यावरून ही निवडणूक कोणत्याही पक्षाचा कार्यक्रमाचा विचार करून मतदारांनी मतदान न करता भ्रष्टाचाराचे राजकीय कारण आणि हिंदुत्ववादी वातावरण याच गोष्टींवर भर देऊन मतदान केलेले दिसते.

परंतु प्रा. शिरशीकरांच्या मतानुसार मागील प्रकरणात उल्लेख केल्याप्रमाणे पक्षाचे ध्येयधोरण, कार्यक्रम आणि जाहिरनामे मान्य असलेला गट असतो, त्यानुसार बदल संभवतो अशा गटाची निश्चिती खालीलप्रमाणे करता येईल.

१) परिवर्तनशील मतदार.

२) गटांनी प्रभावित मतदार.

ह्या दोन गटांच्या मतदानातून मात्र जाहिरनामे, धोरणे आणि कार्यक्रम यांचा परिणाम होऊन बदल आढळतो.

वरील गटांची निश्चिती -

**कॉंग्रेस**

| | % मतदान | फरक |
|---|---|---|
| १९८० | ४२.४३ | १९८० ते १९८४ = -- ६ % |
| १९८४ | ४८.९ | १९८४ ते १९८९ = - ८.१६ % |
| १९८९ | ४०.७४ | |

यावरुन १९८४, १९८९ मध्ये अनुक्रमे -- ६ %, -- ८% आढळणारा फरक म्हणजे परिवर्तनशील किंवा गटांनी प्रभावीत मतदार होय.

**जनता पक्ष**

| | % मतदान | फरक |
|---|---|---|
| १९८० | १८.५ | १९८० ते १९८४ = - ११ % |
| १९८४ | ७.१३ | १९८४ ते ८९ = -- १०.८० % |

यावरुन १९८४, १९८९ मध्ये अनुक्रमे - ११ %, -- १० % आढळणारा फरक म्हणजे परिवर्तनशील किंवा गटांनी प्रभावित मतदार होय.

भाजप -

| | % मतदान | फरक | |
|---|---|---|---|
| १९८४ | ७.९ | १९८४ ते ८९ | = -- ४ % |
| १९८९ | ११.८३ | | |

१९८९ मध्ये आढळणारा फरक -- ४ % म्हणजे परिवर्तनशील किंवा गटांनी प्रभावित मतदार होय.

मा.क.प.

| | % मतदान | फरक | |
|---|---|---|---|
| १९८० | ६.१ | १९८० ते १९८४ | = - ०.२ |
| १९८४ | ५.९ | १९८४ ते १९८९ | = -- ०.७ |

यावरून १९८४, १९८९ मध्ये अनुक्रमे - ०.२ %, -- ०.७ % फरक म्हणजे परिवर्तनीय किंवा गटांनी प्रभावित मतदार होये.

वरीलप्रमाणे जर विश्लेषण केले तर १९८४ व १९८९ च्या निवडणुकांच्या तुलनेत १९८९ च्या निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाच्या मतदारात -- ८ टक्क्यांनी घट झालेली दिसते पण भा.ज.प. पक्षाच्या मतदारात -- ४ टक्क्यांनी वाढ आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षांच्या मतदारात -- .७ टक्क्यांनी वाढ झालेली आढळते म्हणजेच ह्या निवडणुकीतील परिवर्तनीय किंवा हितसंबंधी गटाचे वर्तन पाहता रामजन्मभूमी, वरिष्ठपातळीवरील भ्रष्टाचार यासारखे राजकीय घटक पक्षांच्या ध्येयधोरणापेक्षा अधिक महत्वाचे ठरले.

सारांश या निवडणुकीत राजकीय पक्षांनी स्वीकारलेली धोरणे आणि कार्यक्रम यांचा मतदार वर्तनावरील प्रभाव पडताळून पाहण्यासाठी समाजातील विविध स्तरातील लोकांच्या मुलाखती घेतल्या त्यावरून असे आढळून आले की, राजकीय पक्षांच्या जाहिरनाम्यापेक्षा, प्रस्थापित राजकीय परिस्थिती, हिंदुत्ववादी वातावरण आणि राजीव गांधींना विविध पातळीवर आलेले अपयश हेच घटक प्रामुख्याने मतदार वर्तनावर मोठ्या प्रमाणावर प्रभाव पाडणारे ठरले. परंतु हे ही स्पष्ट होते की या निवडणुकीत मतदारांनी कोणत्याही एका पक्षावर विश्वास टाकलेला नाही.

संदर्भ

१ डॉ. घोराळकर अशोक, भारतीय लोकसभेची १९८९ ची निवडणूक
समाजवादी प्रबोधिनी प्रकाशन पान ७.

२ इबिड पान ८.

३ महाराष्ट्र टाइम्स, दि. ७ नोव्हेंबर १९८९, पान १.
दि टाइम्स ऑफ इंडिया, दि. ७ नोव्हेंबर १९८९ पान १.
दि टाइम्स ऑफ इंडिया, दि. ८ नोव्हेंबर १९८९ पान १४.

४ महाराष्ट्र टाइम्स, २३ नोव्हेंबर १९८९ पान ४.
टाइम्स ऑफ इंडिया, १३ नोव्हेंबर १९८९ पान ११.

५ दि टेलीग्राफ, ९ नोव्हेंबर १९८९ पान १; ४.
महाराष्ट्र टाइम्स, ९ नोव्हेंबर १९८९ पान १, २.

६ दि टाइम्स ऑफ इंडिया, २७ ऑक्टोबर १९८९, पान १४.
दि टाइम्स ऑफ इंडिया, २८ ऑक्टोबर १९८९, पान ३०.